# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 01/09/2023 (शुक्रवार) सायंकाळ

---

## अन्यायाने कैदेत ठेवण्याचे उद्देशाने पळवून नेणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद

**पोस्टे रामटेक** :– फिर्यादी ही आपले आई वडिल बहिण भावासह राहते. फिर्यादीचे घराचे शेजारी कुसुम शेळके हे राहतात. ते म्हातारे असल्याने त्यांना चालता येत नाही. त्याचे घरी असलेल्या बायबलला कव्हर लावण्याकरीता फिर्यादीला त्यांनी कव्हर आणायला सांगीतले. दिनांक ३०/०८/२०२३ रोजी दुपारी १२/०० वा. दरम्यान फिर्यादी यांचे घराचे जवळ ०५ ते १० मिनिटांचे अंतरावर असलेल्या दुकानात गेली. दुकानात जात असताना फिर्यादीने स्वत:चा मोबाईल न नेता चुकीने आईचा मोबाईल घेवुन गेली. दुकानातुन कव्हर घेवुन परत येत असता कोणीतरी अज्ञात इसमाने फिर्यादी हीचे तोंडाला पांढरा रूमाल लावल्याने फिर्यादी हि बेशुदध झाली. सायं. ०५/३० वा. शुदधीवर आली. तेव्हा ती रस्त्याचे बाजुला एका मॅक्सी गाडी मध्ये झोपलेली दिसली व बाजुला दोन इसम रस्त्याचे बाजुला असलेल्या झाडी झुडपात दारू पित होते. त्यातील एका इसमाने अंगात सिमेंट रंगाचा हाफ पॅन्ट आणी मोरपंखी रंगाचा शर्ट व गळयात पांढऱ्या रंगाचा दुपट्टा होता. दुसऱ्या इसमाचे अंगात सिमेंट रंगाचा हाफ पॅन्ट आणि गळयात पांढऱ्या रंगाचा दुपट्टा दिसला. त्या दोन्ही इसमाचा चेहरा फिर्यादी यांना बरोबर दिसला नाही. तिसरा पुरूष त्याने अंगात सिमेंट रंगाचा हाफ पॅन्ट आणी लाल रंगाचा शर्ट घातलेला दिसला. गळयात पांढऱ्या रंगाचा दुपट्टा दिसला. फिर्यादी ही पटकन मॅक्सी गाडी मधुन उतरून पळत असता ते तिन्ही पुरुष फिर्यादीच्या मागे धावु लागले. त्यानंतर फिर्यादि हि काही अंतरावर पळाली असता एका झाडाचे मागे लपली. त्यानंतर त्या इसमांना फिर्यादी दिसुन न आल्याने ते आपले गाडीने तिथुन निघुन गेले. त्यानंतर फिर्यादी रस्त्याने पायी पायी चालु लागली काही अंतरावर गेलेवर फिर्यादी यांनी घरी फोन लावुन माहिती दिली. तेव्हा फिर्यादी यांना एखादया दुकानात जाण्यास सांगीतले तेव्हा फिर्यादी काही दुर पायी चालल्यानंतर रस्त्याच्या बाजुला एक घर दिसले. तेथे जावून तेथिल हजर असलेल्या इसमास झालेला सर्व प्रकार सांगीतला. त्यांनी फिर्यादी यांना पोलीस स्टेशन रामटेक येथे आणले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पोस्टे रामटेक येथे आरोपीतांविरूध्द कलम ३६५ भादंवि अन्वये गुन्हा नोद असून आरोपीतांचा शोध घेणे सुरू आहे. गून्हयाचा पूढील तपास पोलीस उपनिरीक्षक कार्तिक सोनटक्के मो. नं. ९४०५९०३५२८ हे करित आहे

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**